जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४३०        दिनांक - १३/०६/२०२३**

## सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## एक पिस्टल व दोन जिवंत काडतुस विनापरवाना जवळ  बाळगणा-याला केले जेरबंद

सिंहगड रोड पोलीस स्टेशऩ हद्दीत गुन्हयाना आळा घालण्यासाठी रेकॉर्डवरील आरोपी तसेच संशयीत इसम यांना चेक करण्याकरीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पो स्टे पुणे यांचे आदेशाने गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करत असताना, **पोलीस अंमलदार राजाभाऊ वेगरे, अमित बोडरे, व अमोल पाटील** यांना त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,एक इसम हा चव्हाण शाळेजवळ काळुबाई मंदीराशेजारी धायरी पुणे येथे संशयास्पद हालचाली  करीत थांबलेला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सपोनि सचिन निकम यांना कळविली असता त्यांनी ती वरिष्ठांना कळवुन त्याबाबत खात्री करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेशित केले.

सदर बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन मिळालेल्या बातमीप्रमाणे खात्री करता बातमी तील वर्णनाचा इसम सदर ठिकाणी उभा असल्याचे दिसले. तो त्या ठिकाणावरुन नजर चुकवुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यास स्टाफचे मदतीने त्याचा पाठलाग करुन काही अंतरावर दि.१०/०६/२०२३ रोजी त्याला शिताफीने पकडुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **तनय गुरुनाथ तोडकर वय २१ वर्षे रा.नरेद्र कॉम्प्लेक्स प्लॅट नं ९ बेनकर वस्ती धायरी पुणे**.असे सांगितले असता त्याची अंगझडती घेता त्याचे कंबरेस पॅन्टच्या आत मध्ये खोसलेले एक ४०,०००/-रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व १०००/-रुपये किंमतीचे दोन जिवंत काडतुसे असा एकुण ४१,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त कऱण्यात आले असुन पुढील तपास गणेश मोकाशी,पोलीस उप निरीक्षक, सिंहगडरोड पोलीस स्टेशऩ पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उपआयुक्त परीमंडळ ३,श्री.सुहेल शर्मा मा.सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग श्री राजेंद्र गलांडे वरीष्ठ पोलीस निरीक्षक,सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे श्री अभय महाजन,पोलीस निरीक्षक(गुन्हे)श्री जयंत राजुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक सचिन निकम,पोलीस उप निरीक्षक गणेश मोकाशी, सहा.पो.फौज.आबा उत्तेकर पोलीस अंमलदार, संजय शिंदे, अमित बोडरे, राजु वेगरे, विकास पांडोळे,विकास बांदल,अमोल पाटील,राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर, देवा चव्हाण, सागर शेडगे, दक्ष पाटील, स्वप्नील मगर, अविनाश कोंडे, यांचे पथकाने केली.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर
सिहगडरोड पोलीस स्टेशन
पुणे